| MHSN060009292024 | Miraj City Police Station<br>PWDVA Appln.31/2024<br>Rupali Babaso Sakate Vs. Sachin Babaso Sakate |
|---|---|

## निशाणी ३४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांनी सी.आर.पी.सी. चे कलम ३४० (१), १९५ (बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम ३७९, २१५) च्या तरतुदीअन्वये अर्जदार हिचेवर कायदेशीर कारवाईकरीता तसेच अर्जदार हिने खोटे शपथपत्र दाखल केले असल्याने तिचेवर खटला दाखल होणेकरीता दाखल केलेला आहे.

२. जाबदारतर्फे वकिल श्री. आय. बी. पालेगार आणि अर्जदारतर्फे श्री. एस. एस. वाटवे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. जाबदार कथन करतात की, प्रकरणात अर्जदार हिने निशाणी १ कडील मूळ अर्जात व त्यासोबतचे शपथपत्रात अर्जदार हिचा व्यवसाय घरकाम दाखविलेला आहे. सदर प्रकरणात अर्जदार हिने निशाणी १ कडील कलम १८ कडील ओळ क्र. २ मध्ये, “दरम्यानच्या कालावधीत अर्जदाराचा रहिवासाचा व उदरनिर्वाहाचा प्रश्न उत्पन्न झालेला आहे” असे नमूद करुन पोटगीची मागणी अर्जदार हिने केलेली आहे. तसेच अर्जदार हिने निशाणी १२ कडे स्वतःचे असेटस इन्कम ॲन्ड एक्सपेंडीचर बाबतचे शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर शपथपत्राचे कलम १० मध्ये मंथली इन्कम या कॉलममध्ये दरमहा र.रु. ३०००/- कमवित असलेबाबतचे शपथेवर कथन केलेले

आहे. तसेच सदर शपथपत्राचे पान. नं. ९ कॉलम नं. ६१ मध्ये गट नं. २७९ या मिळकतीबाबतचा उल्लेख केलेला आहे. तसेच अर्जदार हिच्या इतर वडीलार्जित वारसा हक्काने मिळालेल्या मिळकतीबाबतचा कोणत्याही प्रकारचा उल्लेख अर्जदार हिने तिच्या मूळ अर्जात केलेला नाही.

३. जाबदार यांचे पुढे कथन आहे की, अर्जदार हिने अर्जामध्ये मौजे देशींग येथील गट नं. ६४९, खाते क्र. २९७, क्षेत्र हे. आर. ०.२१.००, तसेच मौजे खरसिंग येथील गट नं. २७६, खाते क्र. ३०९८, क्षेत्र हे. आर. ०.६१.७५ आणि मौजे खरशिंग येथील गट नं. २७९, खाते क्र. ३०९८, क्षेत्र हे. आर. ०.६४.५० अशा नमद केलेल्या मिळकती सदर असेटस इन्कम ॲन्ड एक्सपेंडीचर या निशाणी १२ कडील शपथपत्रात नमुद केलेल्या नाहीत. सदर अर्जदार हिने निशाणी ५ कडे जाबदार नं. १ यांचेकडून अंतरीम पोटगी मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हिने पोटगी मागणी अर्जात अर्जदार ही व्यवसाय या मथळयाखाली घरकाम करीत असलेबाबत उल्लेख करुन तदअनुषंगिक ज्यादा पोटगीची रक्कम मिळावी याकरीता खोटे शपथपत्र दाखल करुन जाबदार यांचेकडून जास्तीत जास्त खोटे शपथपत्राआधारे पोटगी मिळविणेकरीता बेकायदेशीर प्रयत्न केलेला आहे.

४. जाबदार यांचे पुढे कथन आहे की, अर्जदार हिने दाखल केलेले कागदपत्रावरुन निशाणी १ कडील अर्ज, निशाणी १२ कडील इनकम ॲफिडेव्हीटचे अवलोकन केले असता अर्जदार हिने तिच्या व्यवसायाबाबतीत, तिच्या स्थावर मिळकतीबाबतीत मे. कोर्टात चुकीची माहिती दाखल करुन तसेच तदअनुषंगिक खोटे शपथपत्र दाखल करुन जाबदार यांचेकडून जास्त रक्कमेचे पोटगीचे आदेश मिळविणेकरीता सदरचे खोटे शपथपत्रांचे आधार घेऊन अंतरीम पोटगीचे अर्ज दाखल केलेले आहेत. अर्जदार हिने सदर खोटे शपथपत्र दाखल केलेले असल्याने व ते

प्रथमदर्शनी मे. कोर्टात दाखल असलेल्या उपलब्ध कागदपत्रांवरुन तसेच दाखल असलेल्या शपथपत्रांवरुन सिध्द होत असल्याने अर्जदार ही अंतरीम पोटगी आदेश मिळविणेस पात्र नाही. अर्जदार हिने सदर खोटे शपथपत्रांचा आधार घेऊन मे. कोर्टाची दिशाभूल करणेचा प्रयत्न करुन तसेच खोटी व चुकीची माहिती शपथपत्रांमध्ये नमूद करुन सी.आर.पी.सी. चे कलम ३४०(१), १९५ (बी.एन.एस.एस.–२०२३ चे कलम ३७९, २१५) च्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अर्जदार हिने अंतरीम पोटगी अर्जाचे अनुषंगे खोटे शपथपत्र दाखल करुन भा.द.वि.सं. कलम १९३, १९९, २०० (बी.एन.एस २०२३ चे कलम २२९, २३६, २३७) अन्वये गुनहा केलेला असल्याने अर्जदार हिचेवर कडक शासन होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्जदार हिने सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. अर्जदारतर्फे जाबदार नं. १ यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन आक्षेप घेतला आहे. अर्जदार यांनी जाबदारच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. वास्तविक अर्जदार यांनी गट नं. २७९ चा उल्लेख केलेला बरोबर आहे. त्यांनी त्यांना येणारे क्षेत्र नमूद केले आहे. वास्तविक यापूर्वीच अर्जदार यांनी त्यांच्या मिळकतीचे उतारे हजर केलेले आहेत. जाबदार हे सदर उता–यावरील संपूर्ण क्षेत्र अर्जदाराचे आहे असे भासवून मे. कोर्टाची दिशाभूल करीत आहेत. वास्तविक वडीलार्जित जमिनीचा उल्लेख अर्जदारांनी केलेला आहे. तसेच सदर जमिनीचे उता–यावरील पिक पाणी नोंद पाहता सदर जमिन पड असल्याचे स्पष्ट होते. तसेच त्यातून अर्जदारांना सद्यस्थीतीला उत्पन्न नाही. वास्तविक अर्जदार यांनी खोटी माहिती मे. कोर्टास दिलेली नाही. आज देखील अर्जदाराचे उत्पन्न र.रु. ३०००/– प्रतिमाह इतकेच आहे. त्याबाबत दाखले मे. कोर्टाकडे हजर केलेले आहेत. याऊलट पूर्वी अर्जदार यांना मिळकत असणारे त्यांच्या औषध क्षेत्रातील उत्पन्न बंद झालेले आहे.

त्याही बाबतीत कागद मे. कोर्टासमक्ष हजर केलेले आहेत. त्यामुळे जाबदार यांचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

६. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० व सध्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३७९ प्रमाणे एखाद्या न्यायालयाच्या कार्यवाहीमध्ये किंवा तिच्या संबंधात अथवा त्या न्यायालयातील कार्यवाहीमध्ये पुराव्यात हजर केलेल्या किंवा दस्तऐवजाबाबत जो कोणताही अपराध घडला असल्याचे दिसत असेल अशा कोणत्याही अपराधाबाबत चौकशी करणे हे न्यायहितार्थ समयोचित आहे असे, यासंबंधात किंवा अन्यथा त्या न्यायालयाकडे आलेल्या अर्जावरुन त्यांचे मत झाले तर असे न्यायालय स्वतःला जरुर वाटल्यास व जरुर वाटेल तशी प्रारंभिक चौकशी केल्यानंतर तशा आशयाचा निष्कर्ष नमूद करुन त्याबाबत लेखी फिर्याद देऊ शकतात व सदरची फिर्याद ही अधिकारीता असलेल्या प्रथमवर्ग दंडाधिका–याकडे पाठवू शकतात. वर नमूद कलमाचा उद्देश हा जेव्हा न्यायालयातील एखाद्या प्रकरणामध्ये सादर केलेल्या पुराव्यामध्ये किंवा कागदपत्रामध्ये न्याय प्रशासनावर परिणाम करणारा गुन्हा घडला आहे असे शाबीत झालेस न्यायालय संबंधीत इसमावर कारवाई करु शकतो. तसेच सदरच्या कलमान्वये दखल घेण्यासाठी न्यायालयाच्या मर्जीनुसार आवश्यकता वाटल्यास प्राथमिक चौकशी करु शकते. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी इकबालसिंग मारवाह वि. मिनाक्षी मारवाह (२००५) ४ एस.सी.सी. ३७० या न्यायनिवाडयामध्ये न्यायाच्या हितासाठी कारवाई करणे योग्य आहे किंवा कसे असे न्यायालयाचे मत होणे आवश्यक आहे. त्यामुळे जाबदार यांच्या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदार हिच्यावर पुढील कारवाई करावी किंवा कसे याकरीता अभिलेखाचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

७. अभिलेखाचे अवलोकन केले. यातील अर्जदार हिने जाबदार यांचेविरुध्द

कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम १२ प्रमाणे अर्ज दाखल केलेला असून कलम २३ नुसार अंतरिम अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी अर्जदार हिने तिचे मालमत्ता व दायित्व शपथपत्र दिनांक १६.११.२०२४ रोजी दाखल केलेले आहे. यातील जाबदार यांचे कथन असे आहे की, अर्जदार हिने शपथपत्रामध्ये तिचा व्यवसाय घरकाम दाखविलेला आहे. तसेच ती दरमहा रक्कम रुपये ३०००/– कमवित असल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे जाबदार याचे कथन आहे की, अर्जदार हिने शपथपत्रामध्ये गट नं. २७९ या मिळकतीबाबतचा उल्लेख केलेला आहे. परंतु अर्जदार हिच्या इतर वडीलार्जित वारसा हक्काने मिळालेल्या मिळकतींचा उल्लेख मूळ अर्जात केलेला नाही. जाबदार यांचे कथन असे आहे की, अर्जदार हिने खोटे शपथपत्र दाखल करुन जास्तीत जास्त पोटगी मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. याऊलट अर्जदार हिने जाबदार यांची सदरच्या अर्जातील संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. अर्जदार हिने तिला येणारे गट नं. २७९ मधील येणारा क्षेत्राचा उल्लेख केल्याचे मान्य केले असून अर्जदार हिने दाखल केलेल्या मिळकतीच्या उता–यावरील संपूर्ण क्षेत्र हे अर्जदारांचे आहे असे भासवून दिशाभूल केल्याचे कथन केले आहे. तसेच वडीलार्जित जमीनीचा उल्लेख अर्जदार हिने केलेला आहे त्या जमिनीच्या ७/१२ उता–यावर सदरची जमीन ही पड असल्याने सद्यपरिस्थीतीत अर्जदार हिस उत्पन्न नसल्याचे दिसून येत असल्याचे नमूद केले आहे. तसेच आजदेखील अर्जदार हिला रक्कम रुपये तीन हजार दरमहा इतकेच उत्पन्न मिळत असल्याचे कागदपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे.

८. यातील अर्जदार हिने दाखल केलेल्या अंतरीम अर्जावर अर्जदार आणि जाबदारतर्फे वकिलांनी युक्तीवाद केलेला असून सदरचा अर्ज आदेशाकरीता प्रलंबित आहे. सदरचा अंतरिम अर्ज आदेशाकरीता प्रलंबित असताना जाबदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. यातील अर्जदार हिने वर नमूद केल्याप्रमाणे शपथपत्रामध्ये

तिचा व्यवसाय घरकाम असलेबाबत तसेच तिला दरमहा रक्कम रुपये ३०००/– मिळत असल्याबाबत नमूद केलेले आहे. तसेच अर्जदार हिने शपथपत्रामध्ये गट नं. २७९ या मिळकतीचा उल्लेख केलेला आहे. याठिकाणी ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे की, जाबदार यांच्या अर्जाप्रमाणे अर्जदार हिने प्रस्तुत प्रकरणात कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरच्या कागदपत्रांमध्ये मिळकतीचे उतारे तसेच बँक खाते उतारे हजर केलेले आहेत. यातील जाबदार याचे कथन असे आहे की, अर्जदार हिने तिच्या मिळकतींचा शपथपत्रामध्ये उल्लेख केलेला नाही. परंतु अर्जदार हिचा अंतरिम अर्ज प्रलंबित असताना अर्जदार हिने मिळकतीचे उतारे तसेच तिला मिळणा–या उत्पन्नाबाबत कागदपत्रे अभिलेखावर हजर केलेले आहेत. प्रस्तुतचे प्रकरण अद्याप प्राथमिक स्टेजला असून अर्जदार व जाबदार यांचा पुरावा होणे बाकी आहे. सदर प्रकरणात अर्जदार व जाबदार यांनी मा. सर्वोच्च न्यायालय यांचे रजनेश वि. नेहा या न्यायनिवाडयामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपले मालमत्ता व दायित्व शपथपत्र दाखल केलेले आहे. सदरचे शपथपत्र दाखल करण्याचा उद्देश हा पोटगीच्या प्रकरणामध्ये लवकरात लवकर प्रकरण निकाली करणे असा आहे. बदललेल्या परिस्थीतीनुसार पक्षकार नवीन शपथपत्र दाखल करु शकतात. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हिचे शपथपत्रामध्ये गट नं. २७९ या मिळकतीचा उल्लेख दिसून येतो. परंतु अर्जदार हिने अभिलेखावर सर्व मिळकतींचे उतारे हजर केलेले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार हिने तिला मिळणा–या उत्तपन्नाबाबत देखील कागदपत्रे हजर केलेली आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे फौ.प्र.संहिता कलम ३४० प्रमाणे कारवाई करणेकरीता न्यायाच्या हेतूस्तव कारवाई करणे योग्य आहे या निष्कर्षास येणे आवश्यक आहे. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार हिने स्वतःकरीता तसेच तिच्या मुलींकरीता पोटगी मिळण्याकरीता तसेच इतर विनंती मंजूर होणकरीता दाखल केलेले आहे. यातील अर्जदार हिने दाखल केलेल्या प्रकरणाचा हेतू लक्षात घेता अर्जदार हिचेवर केवळ तिने तिच्या शपथपत्रामध्ये मिळकतींचा उल्लेख केला नाही याकरीता कारवाई करणे अगर

त्याबाबत आदेश करणे न्यायाच्या हेतुस्तव योग्य वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजुर करणेत येतो.

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

ठिकाण –मिरज. (अनिरुध्द एस. राणे)
दिनांक –०३.११.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज